# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७
E Mail-1)desk15dte@gmail.com 2) System@dte.org.in 3) Desk15@dte.org.in


परिपत्रक

क्रमांक:-१५/अर्थस/ईबीसी/प्रमाणपत्र /२०१६-१७/88
दिनांक :- 6 SEP 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेबाबत संबंधित संस्थेनी विद्यार्थ्यांची यादी प्रमाणित करुन देणेबाबत (संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्जाबाबत)

संदर्भ :- उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. टीईएम/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि. ३१ मार्च. २०१६.

उपरोक्त विषयाबाबत सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व खाजगी विनानुदानित व कायम विनानुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतना समवेत शासकीय व अनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने/शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणा-या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी खालीलप्रमाणे प्रमाणपत्र सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरून सुचित करण्यात यावे.

१) ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व पालकांचे उत्पन्न रु. १ लाखापेक्षा कमी आहे.
२) ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व शासनाच्या प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) झालेले आहेत.
३) ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहे.
४) ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व विद्यार्थी फक्त ईबीसी या योजनेचा लाभ घेत असून दुस-या कोणत्याही योजनेचा लाभार्थी नाही अथवा अर्ज सुध्दा केला नाही.
५) ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व विद्यार्थ्याचे आधार कार्ड काढलेले असून त्यांच्या बँक खात्यांशी लिंक करणे आवश्यक आहे. यांची सर्व जबाबदारी संबंधित संस्थाप्रमुख / प्राचार्याऱ्यांची राहील. तसेच पात्र विद्यार्थ्यांना इबीसी रक्कम संस्थेकडून सदर खात्यात ईसीएसव्दारे जमा करण्यात येईल.
६) तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे दिनांक ३१ मार्च २०१६ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करुनच ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मुद्द्यांची पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित संस्था प्रमूख/प्राचार्य यांची राहील, तसेच विभागीय कार्यालयांनी लाभार्थी विद्यार्थ्यांची यादी घेतांना संबंधित संस्थेकडून वरील मुद्द्यांबाबत प्रमाणित करुन प्रमाणपत्र घेण्यात यावे.

EBC
प्रति
शाखा
Ram
6/12

सहसंचालक तंत्रशिक्षण ... नागपूर
6344
... SEP 2016

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :- प्रणाली विश्लेषक तथा समन्वयक, कार्यासन क्रमांक -३, मुख्य कार्यालय, मुंबई यांच्या माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता.

---

क्र.तंशिसं/विकाना/ईबीसी-ऑनलाईन-फार्म/2016/ 2551
दिनांक : - 7 SEP 2016

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने तसेच
शासकीय व अनुदानित पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविका संस्था
नागपूर विभाग, नागपूर

उपरोक्त पत्रात नमूद केल्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन पत्रातील मुद्यांबाबत प्रमाणित करुन प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर